पुढारी पुरवणी
दि. 14/03/2022

# रेडिओ ट्रान्समिशन एन्टेनाजवर 'विवेकानंद'मध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत व रुसा पुरस्कृत 'रेडिओ ट्रान्समिशन एन्टेनाज' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे राजाराम महाविद्यालय इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. पी. यू. लांडे यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे सत्र मार्गदर्शक डॉ. गणेश वाघमारे, सीनिअर एन्टेना इंजिनिअर, इंटेल, बेंगलोर यांनी सध्याच्या टेक्नॉलॉजीमध्ये वापरल्या जाणाऱ्या एन्टेनाची डिझाईन सॉफ्टवेरच्या सहाय्याने कशी करता येऊ शकते, याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. एन. पी. मोटे व प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिला. डॉ. पूनम जाधव व प्रा. जी. बी. जिरगे यांनी सूत्रसंचालन केले.